Vol III Issue I Feb 2013
Impact Factor : 0.2105
ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-chief
H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue.1,Feb. 2013
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षण : सद्यस्थिती

*रामनाथ सांगुळे , विष्णु काळे*

मत्स्योदरी महाविद्यालय, जालना

*सारांश*

मानवी जीवनात मनुष्याला सुसंस्कारामुळे मनुष्यत्त्व प्राप्त होते. जन्मतः मनुष्याला वागणे, बोलणे, विचार व भावना या सर्वांची जाणीव असतेच असे नाही. वयपरत्त्वे मनुष्याची वाढ होत जाते.त्या अनुषंगाने त्याचा विकास होत जातो. त्यात त्याचा बौध्दीक, मानसिक, सामाजिक स्वरुपाचा विकास होत असतो. हा सर्व प्रकारचा विकास मात्र शिक्षणातूनच होत असतो, असे जॉन ड्यूई यांचे मत आहे.

### *प्रस्तावना*

मानवाच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीच्या दृष्टीकोनातून शिक्षण सर्वमान्य झाले आहे. शिक्षणातून नावलौकीकाच्या संधी तर मिळतातच शिवाय शिक्षणाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी देखील मिळतात व त्यातून देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळत जाते. म्हणून स्वामी विवेकानंद असे म्हणतात की, मानवाचे शरीर, मन आणि आत्मा यांना विकसित करणे हे खऱ्या अर्थाने शिक्षणाचे उद्दीष्ट असले पाहिजे.

प्राथमिक शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकास, समाजपरिवर्तन व आर्थिक विकासाचे महत्त्वाचे साधन मानले जाते. वाचन, लेखन आणि उपयोजित गणित ही साक्षरतेची मुलभूत कौशल्य इथेच संपादित केली जातात. प्राथमिक शिक्षण वयोगटातील मुलामुलींचा सर्वांगीण विकास साधन्याचा प्रयत्न औपचारिक शिक्षण व्यवस्थेतील प्राथमिक शिक्षणातून व्हावा असा अर्थ अभिप्रेत आहे.

प्राथमिक शिक्षण हा व्यक्तीच्या आयुष्यातील इतर सर्व शिक्षणाचा पाया आहे. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात प्राथमिक शिक्षणाच्या झालेल्या प्रयत्नांचा परिणाम म्हणून राज्यघटना अंमलात आल्यापासून दहा वर्षाच्या आत देशातील सर्व मुलामुलींना त्यांच्या वयाची चौदा वर्ष पूर्ण होईपर्यंत सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यासाठी शासन प्रयत्नांची पराकाष्टा करेल अशी तरतूद करण्यात आली होती. राज्यघटनेतील या आश्वासनाला 63 वर्षे पूर्ण होवून गेली असली तरी प्राथमिक शिक्षणाचे स्वप्न या ना त्या कारणाने अद्याप पर्यंत सत्यात उतरलेले दिसत नाही. थोडक्यात महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाची वाटचाल सुरळीत असतांना शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झालेले दिसत नाही म्हणजेच महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणात आजही वेगवेगळया स्वरुपाची आव्हाने उभी आहेत, तेंव्हा प्रस्तुत लेखात प्राथमिक शिक्षणाची सद्यःस्थिती जाणून घेण्यासाठी पुढील काही निवडक घटकांचा विचार करण्यात आलेला आहे.

### *प्राथमिक शाळांची संख्याः*

मानवी जीवनात घराला जसे स्थान प्राप्त झाले आहे, अगदी त्याचप्रमाणे शिक्षणात शाळांना महत्त्व प्राप्त झाले आहे. तेंव्हा सर्वशिक्षा अभियानाच्या सुरुवातीपासून आजपर्यंत प्राथमिक शाळांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येते, कारण 2000–01 मध्ये महाराष्ट्रात प्राथमिक शाळांची संख्या 59804 एवढी होती. त्यात 57.72 टक्के एवढी वाढ होवून 2009–10 पर्यंत प्राथमिक शाळांची संख्या 94325 एवढी झालेली आहे. तसेच विभागनिहाय प्राथमिक शाळांच्या संख्येवरुन असे दिसून येते की, पूणे विभागात सर्वाधिक (19625) शाळा असून अमरावती विभागात (10553) सर्वात कमी प्राथमिक शाळा आहेत.

### *प्राथमिक शाळातील एकूण पटनोंदणी :*

शिक्षणापासून पिढ्यानपिढ्या वंचित राहिलेल्या समाजघटकांना शिक्षणाची दारे खुली करण्यासाठी महाराष्ट्रात अनेक स्तरावर प्रयत्न करण्यात आले. मुलगी शिकली, प्रगती झाली या घोषणेला जन्म देणाऱ्या महाराष्ट्राच्या जाणीवा याबाबतीत सजग आणि समृध्द आहेत. याचाच एक भाग म्हणून राज्य शासनाने मुलींना शाळेत पाठवणाऱ्या पालकांना दररोज एक रुपया उपस्थिती भत्ता सुरु केला. या योजनेला पालकांनी प्रतिसाद दिला.रोज मिळणाऱ्या रुपयासाठी का होईना, लोक आपल्या मुलीला शाळेत पाठवू लागले. त्यामुळे स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महाराष्ट्रात मुलींची निरक्षरता संपवण्याच्या उद्देशाला बळ मिळाले. असे असतांनाही महाराष्ट्रातील पटनोंदणीत मुलींचे प्रमाण मुलांच्या तुलनेत कमी आहे.

महाराष्ट्रातील प्राथमिक शाळातील एकूण पटनोंदणीत 2000–01 मध्ये मुलाचे पटनोंदणी प्रमाण 51.83 टक्के (6146031) एवढे तर मुलींचे पटनोंदणी प्रमाण 48.17 टक्के (5711813) एवढे होते, जे मुलांच्या तुलनेत कमी आहे. सन 2000–01 पासून 2009–10 पर्यंत एकूण पटनोंदणीत मुलांचे प्रमाण वाढत असल्याचे व मुलींचे पटनोंदणी प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येते. 2009–10 पर्यंत हे प्रमाण वाढत जावून एकूण पटनोंदणीत मुलांचे प्रमाण 52.34 टक्के (5419397) एवढे व मुलींचे पटनोंदणी प्रमाण 47.66 टक्के (4935016) एवढे झालेले आहे. थोडक्यात एकूण पटनोंदणीत मुलींच्या पटनोंदणी प्रमाणात घट व मुलांच्या पटनोंदणी प्रमाणात वाढ होत आहे.

**Title :** *महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षण : सद्यस्थिती*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850]** *रामनाथ सांगुळे , विष्णु काळे* **yr:2013 vol:3 iss:1**

प्राथमिक शाळातील एकूण पटनोंदणीत प्रवर्गनिहाय पटनोंदणी :

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावे, तळागाळातील विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण मिळावे व राज्यातील प्रत्येक प्रवर्गातील मुलांच्या पटनोंदणीत वाढ व्हावी यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न होत आहेत, त्या दृष्टीकोनातून राज्यातील एकूण पटनोंदणीत प्रवर्गनिहाय पटनोंदणीचे प्रमाण अभ्यासले असता महाराष्ट्रातील प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरातील शाळेत एकूण पटनोंदणीत 2005–06 मध्ये एस.सी. प्रवर्गाचे सरासरी पटनोंदणी प्रमाण 14.25 टक्के एवढे होते. त्यात 0.25 टक्के एवढी वाढ होवून ते 2009–10 मध्ये 14.50 टक्के एवढे झाले आहे, एस.टी. प्रवर्गाच्या पटनोंदणी प्रमाणात 0.75 टक्के एवढी वाढ होवून 2009–10 मध्ये ते 11.10 टक्के एवढे झालेले आहे. मात्र ओ.बी.सी. विद्यार्थ्यांच्या पटनोंदणी प्रमाणात वाढ होण्याऐवजी घट झाल्याचे दिसून येते.

### *शिक्षक – विद्यार्थी गुणोत्तर :*

प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता ही विविध घटकांवर अवलंबून असते. त्यातलाच एक महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक विद्यार्थी गुणोत्तर होय. प्रति शिक्षकामागे विद्यार्थी संख्या जेवढी कमी तेवढा शैक्षणिक विकास अधिक वेगाने होण्यास मदत होते. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने प्राथमिक शिक्षणात हे प्रमाण 1:40 असे निर्धारित केलेले आहे. अलिकडे 2009 च्या शिक्षण हक्क कायद्यात या गुणोत्तरात बदल करुन हे प्रमाण 1:29 असे निर्धारित करण्यात आलेले आहे. तेंव्हा महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणातील हे प्रमाण अभ्यासले असता 2000–01 मध्ये शिक्षक – विद्यार्थी गुणोत्तर 1:38 असे होते, ते 2009–10 मध्ये कमी होवून 1:30 असे झाल्याचे दिसून येते. म्हणजे महाराष्ट्र शासन निर्धारित केलेले 1:40 शिक्षक – विद्यार्थी गुणोत्तर कायम ठेवण्यात यशस्वी वाटचाल करत असल्याचे दिसून येते, मात्र 2009 च्या कायद्यातील बदलामुळे महाराष्ट्रातील औरंगाबाद, अमरावती, नाशिक व कोकण विभागात हे प्रमाण कायम (1:29) ठेवण्यासाठी नव्याने शिक्षकांच्या नेमणुका कराव्या लागणार आहेत.

### *प्राथमिक शाळातील स्त्री–पुरुष शिक्षक प्रमाण*

शिक्षणात मुलींची पटनोंदणी व उपस्थिती वाढविण्यासाठी स्त्री शिक्षिकांचा शिक्षणातील सहभाग महत्त्वाचा आहे. तसेच गुणवत्ता वाढीकरीता एकूण शिक्षकांची भरती देखील तितकीच महत्त्वाची मानली जाते, शिक्षक भरती संदर्भात शासन स्तरावरुन केले जाणारे प्रयत्न सकारात्मक स्वरुपाचे आहेत. कारण 2000–01 मध्ये एकूण शिक्षक संख्या 312534 एवढी होती, त्यात 9.14 टक्के एवढी वाढ होवून 2009–10 मध्ये 341098 एवढी झालेली आहे. तसेच एकूण शिक्षक संख्येत 2000–01 मध्ये स्त्री शिक्षिकांचे प्रमाण 42.74 टक्के (133581) एवढे होते. ते वाढत जावून 2009–10 मध्ये 47.03 टक्के (160420) एवढे झालेले आहे. म्हणजेच पुरुष शिक्षकांचे प्रमाण स्त्री शिक्षिकांच्या तुलनेत कमी झाल्याचे दिसून येते. थोडक्यात प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी, शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी व निर्धारित शिक्षक – विद्यार्थी गुणोत्तर कायम ठेवण्यासाठी महाराष्ट्रातील एकूण शिक्षक संख्येत वाढ झाल्याचे व मुलींची पटनोंदणी व उपस्थिती टिकविण्यासाठी एकूण शिक्षक संख्येत स्त्री शिक्षिकांचे प्रमाण देखील वाढत आहे.

### *प्राथमिक शिक्षणात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण*

सर्वशिक्षा अभियानाच्या माध्यमातून शाळाबाहय मुलांचे प्रमाण कमी करुन गळती थांबविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत परंतु प्राथमिक शिक्षणातील गळतीचे प्रमाण आजही पूर्णतः कमी झालेले दिसत नाही. कारण 1990–91 मध्ये राज्यातील शाळामधील मुलांचे आणि मुलींचे इयत्ता पाचवीसाठी गळतीचे प्रमाण अनुक्रमे 29 व 39 टक्के होते. 2002–03 मध्ये मुलांचे आणि मुलींचे गळतीचे प्रमाण कमी होवून ते अनुक्रमे 13 व 14 टक्के इतके कमी झालेले आहे. तसेच 2002–03 ते 2009–10 या कालावधीत प्राथमिक स्तरातील सरासरी गळतीचे प्रमाण कमी होवून 10 टक्के तर उच्च प्राथमिक स्तरातील गळतीचे प्रमाण 19 टक्के एवढे कमी झालेले आहे.

### *राज्य शासनाचा प्राथमिक शिक्षणावरील खर्च :*

देशात व राज्यात शिक्षणासाठी केली जाणारी तरतुद अपुरी पडत आहे, त्यामुळे देशातील सार्वजनिक आरोग्याप्रमाणेच शिक्षणाची पायाभूत व्यवस्थाही कुपोषित झालेली आहे. असे मत डॉ. अब्दुल कलाम यांनी 14 ऑगष्ट 2004 रोजी केलेल्या भाषणात व्यक्त केले आहे. शिक्षणाची कुपोषित झालेली व्यवस्था सुधारण्यासाठी शिक्षणावर राष्ट्रीय खर्चाच्या किमान सहा टक्के रक्कम खर्च होणे आवश्यक आहे. परंतु शासनाचा 2000 ते 2010 या कालावधीत प्राथमिक शिक्षणावर स्थूल राज्य उत्पन्नाच्या केवळ 1.19 टक्क्याच्या दरम्यानच खर्च झालेला आहे.

सन 2000–01 मध्ये राज्य शासनाचा प्राथमिक शिक्षणावर 3545 कोटी रुपये एवढा खर्च करण्यात आला होता.त्यात 184.76 एवढी वाढ होवून 2009–10 मध्ये 10096 कोटी रुपये एवढा करण्यात आलेला आहे. जो इतर काही राज्याच्या तुलनेत कमी आहे. प्राथमिक शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार खऱ्या अर्थाने करावयाचा असेल तर शिक्षणासाठीची आर्थिक तरतूद वाढवून निर्धारित केलेल्या घटकावर खर्च होते किंवा नाही याची शहानिशा करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

### *महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाबाबतचे काही निर्देशक*

शिक्षण हे सामाजिक बदलाचे महत्त्वाचे साधन आहे. त्यातून संस्कारक्षम पिढी निर्माण होत असते. शिक्षणाने व्यक्तीची जशी जडणघडण होते, तशी राष्ट्राचीही बांधणी होत असते. म्हणून महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाचा आढावा घेण्यासाठी वर उल्लेख केलेल्या घटका व्यतिरिक्त इतर काही निर्देशांकाचा आधार घेण्यात आलेला आहे.

2002–03 मध्ये महाराष्ट्रात एक वर्गखोली असणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 19.1 टक्के एवढे होते. ते 2009–10 मध्ये कमी होवून 9.3 टक्के एवढे झालेले आहे. तर प्राथमिकसह उच्च प्राथमिक शाळांमध्ये हे प्रमाण 0.4 टक्के एवढे झालेले आहे.

प्राथमिक शिक्षणात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पायाभूत भौतिक सोयी सुविधांमध्ये पिण्याचे पाणी व प्रसाधनगृह याकडे पाहिले जाते. या सुविधांच्या निर्देशकाकडे पाहिले असता असे लक्षात येते की, 2002–03 मध्ये 26.6 टक्के प्राथमिक व 51.9 टक्के प्राथमिक सह उच्च प्राथमिक शाळात प्रसाधनगृहाची सुविधा होती, त्यात वाढ होवून हे प्रमाण 2009–10 मध्ये अनुक्रमे 72.3 टक्के व 81.8 टक्के एवढे झालेले आहे. तसेच 90.2 टक्के प्राथमिक व 95.9 टक्के उच्च प्राथमिक शाळांना पिण्याच्या पाण्याची सुविधा आहे.

विद्यार्थी–वर्गखोली गुणोत्तरात बदल होवून हे प्रमाण प्राथमिक शाळांच्या संदर्शत 30 व प्राथमिक सह उच्च प्राथमिक शाळांच्या संदर्शत 34 एवढे झाल्याचे दिसून येते. शिवाय 75.7 टक्के प्राथमिक व 77.4 टक्के उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना रॅम्पची सुविधा उपलब्ध आहे.

थोडक्यात प्राथमिक शिक्षणाची सद्यःस्थिती जाणून घेण्यासाठी साक्षरता, शाळांची संख्या, एकूण पटनोंदणी प्रमाण, एकूण पटनोंदणीत इतर प्रवर्गाचे प्रमाण, शिक्षक–विद्यार्थी गुणोत्तर, स्त्री–पुरुष शिक्षक प्रमाण, गळतीचे प्रमाण, प्राथमिक शिक्षणावरिल खर्च व इतर काही निर्देशक इत्यादी घटकांचा विचार करण्यात आला. त्यावरुन असे लक्षात येते की, महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाचा संख्यात्मक स्वरुपाचा विस्तार बऱ्यापैकी झाला असला तरी गुणात्मक स्वरुपाच्या व पायाभूत सोयीच्या उपलब्धतेला काही प्रमाणात खीळ बसलेली दिसत आहे. असे अनेक सर्वेक्षणांती देखील दिसून आलेले आहे. तसेच भटक्या विमुक्त समाजातील विद्यार्थी भटकंतीमुळे अद्यापही पूर्णतः शैक्षणिक प्रवाहात आलेले दिसत नाहीत. पारधी समाजाला आपले शासन आजही जवळ करु शकले नाही. त्यामुळे शैक्षणिक प्रगती त्यांच्या बाबतीत अतिशय दूरचा विषय होवून बसलेला आहे. शासन स्तरावर स्थलांतरित मजुरांच्या मुलांसाठी विविध उपाययोजना केल्या, ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा सुरु झाल्या तरीही त्या सर्व मुलांना शिक्षणाच्या जाळयात आणणे शक्य झालेले दिसत नाही. त्याचप्रमाणे आदिवासी शगातील, विटभट्टी, दगडखाणी वरील मुले, सर्कस, तमाशातील कलावंतांच्या मुलांच्या प्राथमिक शिक्षणाचे प्रश्न आजमितीलाही अनुत्तरीतच आहेत. याचा अर्थ महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाच्या विस्तार व विकासाला अजुनही काही प्रमाणात वाव आहे.

***संदर्भ :–***

1) शिक्षणाची तात्त्विक आणि समाजशास्त्रीय भूमिका – डॉ. सौ. प्रतिश पेंडके, विद्या प्रकाशन, नागपूर 2010
2) दैनिक लोकमत 22 मार्च 2011
3) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2001 ते 2011 – अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.
4) शिक्षण – प्रा. विलास रणसुभे प्रकाश विश्वासराव लोकवाङमयगृह मुंबई, जुन 2005.
5) सार्वजनिक अर्थकारण – डॉ. ज. फा. पाटील, फडके प्रकाशन, कोल्हापूर डिसेंबर 2004.
6) अर्थ व सांख्यिकी संचालनालय पूणे कार्यालय अहवाल.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net